दैनिक हेराल्ड

31/08/2015

# 'राष्ट्रीय सेवा योजना' सेवेचा प्रभावी मार्ग

## आमदार दीपक केसरकर यांचे गौरवोद्गार

**दोडामार्ग, दि.३० (प्रतिनिधी) :**

जीवनात कोणतेही काम करताना कमीपणा बाळगू नये, आपल्याला मोठे व्हायचे असेल तर कामाशी एकनिष्ठ राहून, न लाजता ते प्रामाणिकपणे करावे. समाजाच्या आप[illegible]कडून काही अपेक्षा असतात व आमणही समाजाचे देणे लागतो. समाजाचे हे ऋण फेडण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी समाजाची सेवा केली पाहिजे. विद्यार्थ्यांवर हे सर्व संस्कार घडवण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्या संस्कार शिबिरातून होत असतात. हा एक सामाजिक सेवा करण्याचा प्रभावी मार्ग आहे, असे प्रतिपादन सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालक व वित्त राज्यमंत्री मा. दीपकभाई केसरकर यांनी मांडले. ते मुंबई विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या दोन दिवसीय जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते पुढे म्हणाले की, विविध आपत्तींना सामोरे जाण्याचे मनोबल प्रत्येकात निर्माण झाले पाहिजे. त्यामुळे समाजाविषयी आपूलकीची भावना निर्माण होते. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटन विकास झाला पाहिजे. त्यासाठी तरुणांनी स्वयंपूर्ण प्रशिक्षीत होऊन पुढाकार घेतला पाहिजे. प्रत्येक तरूणांनी आपल्या गावातील गरजा ओळखून त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. हा बदल करण्याची क्षमता तरूणांमध्ये आहे.



देशाच्या विकासात तरूणांचे योगदान महत्वाचे आहे. मात्र, हा विकास साधण्यासाठी निसर्ग आणि उद्योग यांची योग्य सांगड घालावी, असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी त्यांनी महाविद्यालयाला सर्वतो सहकार्य करण्याचे व आमदार निधीतून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्यासाठी ५ लाख रू. निधी देण्याचे आश्वासन दिले.

दोन दिवस चालणाऱ्या या शिबिरात स्वयंसेवकांना आपत्ती व्यवस्थापनाची संकल्पना व ते कसे करावे याविषयी तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. तसेच त्यांच्याकडून प्रात्यक्षिक करून घेतली जाणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य व स्वातंत्र्यसेनानी भाई परमेकर होते. त्यांच्या हस्ते दीपक केसरकर यांचा सत्कार करण्यात आला तर प्राचार्य डॉ.व्ही. ए. पाटील यांनी मुंबई विद्यापीठ एन.एस.एस. विभाग समन्वयक प्रा. बी. एस. बिडवे यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. व्ही.ए. पाटील यांनी केले. या शिबिराची संकल्पना महत्त्व व उद्दिष्ट्ये प्रा.बी. एस. बिडवे यांनी सांगितले. यावेळी व्यासपीठावर प्रांताधिकारी व्ही.जी. इनामदार, तहसिलदार संतोष जाधव, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य बाबुराव धुरी, सूवन कोरगावकर, उपसभापती आनंद रेडकर, पत्रकार, ग्रामस्थ, विद्यार्थी, जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून आलेले एन.एस.एस. स्वयंसेवक उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ.एस.यु. दरेकर व प्रा. आर. ए. मोरे यांनी तसेच प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सोपान जाधव, तर आभार प्रा.आर. ए. मेरे यांनी केले.